पुढारी



आजरा : येथील आपत्तीग्रस्त मनोहर भुसारी यांना आर्थिक मदत देताना रवळनाथ हौसिंग सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले. शेजारी प्रा. डॉ. दत्ता पाटील, महेश मजती, सौ. नूरजहाँ सोलापुरे, डी. के. मायदेव व उत्तम दळवी.

# आपत्तीग्रस्त कुटुंबाला रवळनाथ हौसिंगकडून २५ हजारांची मदत

**आजरा (पुढारी वृत्तसेवा) :** सध्या सुरू असणाऱ्या पावसामुळे घरांची पडझड सुरू आहे. आजरा शहरातील मनोहर चंद्रशेखर भुसारी यांच्या राहत्या घराची भिंत कोसळून नुकसान झाले. या आपत्तीग्रस्त भुसारी कुटुंबाला आजऱ्यातील रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी (मल्टिस्टेट) संस्थेने २५ हजारांची आर्थिक मदत करून आधार दिला. भुसारी यांच्या राहत्या घराची पावसामुळे भिंत कोसळल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांना समजली. तत्काळ चौगुले यांनी संचालक मंडळ व आजरा शाखा सल्लागार मंडळाला सोबत घेऊन भुसारी कुटुंबीयांची भेट घेऊन विचारपूस केली व पडलेल्या घराची उभारणी करण्याकरिता भुसारी यांना रोख रु. २५ हजारांची मदत केली. यावेळी शिवाजी विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळ अध्यक्ष प्रा. डॉ. दत्ता पाटील, रवळनाथचे संचालक महेश मजती, आजरा शाखा सल्लागार नूरजहाँ सोलापुरे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव, आजरा शाखाधिकारी उत्तम दळवी आदी उपस्थित होते.

My Kolhapur Edition
Jul 30, 2021 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

लोकमत

न्यूज Inbox

# ‘रवळनाथ’कडून आपत्तीग्रस्तांना मदत

पेरणोली : रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीकडून आजरा येथील आपत्तीग्रस्त कुटुंबाला २५ हजार रुपयांची मदत केली. येथील मनोहर चंद्रशेखर भुसारी यांच्या राहत्या घराची भिंत अतिवृष्टीमुळे कोसळली. ही माहिती संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांना समजताच चौगुले यांनी संचालक मंडळाला सोबत घेऊन भुसारी कुटुंबीयांना २५ हजारांचा धनादेश सुपुर्द केला. यावेळी प्रा. दत्ता पाटील, संचालक महेश मजती, नूरजहाँ सोलापुरे, मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव, शाखाधिकारी उत्तम दळवी आदी उपस्थित होते.

Hello Kolhapur Gramin
Page No. 3 Jul 29, 2021
Powered by: erelego.com